**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २४ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **विकसित भारत घडविण्यात युवा वर्गाची भूमिका महत्त्वाची असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं 'मन की बात' मधून प्रतिपादन.**
2. **विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश; एकूण मतदानाच्या 26 पूर्णांक 77 टक्के मतदान भाजपला तर काँग्रेसला 12 पूर्णांक 42 टक्के इतकं मतदान.**
3. **उद्यापासून सुरू होणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आज सर्व पक्षीय बैठक संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न.**
4. **केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत अखिल भारतीय अनुसूचित जाती आणि जमाती, रेल्वे कर्मचारी संघटनेचं उद्यापासून नागपुरात दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन.**
5. **भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संवैधानिक मूल्यांच्या जागरासाठी 26 नोव्हेंबरपासून वर्षभर होणार विविध उपक्रम.**

**मन कि बात**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा ११६ वा भाग होता. 'मन की बात' म्हणजे देशातील युवा वर्गाची स्वप्नं आणि देशातील नागरिकांच्या आकांक्षांबद्दलची गोष्ट असल्याचं प्रतिपादन त्यांनी या कार्यक्रमात केलं. आज आज एनसीसी अर्थात नॅशनल कॅडेट कॉर्प्स दिवस आहे. या निमित्त त्यांनी एन सी सी च्या विद्यार्थ्यांचं कौतुक केलं. 'एनसीसी', तरुण-तरुणींमध्ये शिस्त, नेतृत्व आणि सेवेची भावना रुजवते. कोणतीही आपत्ती आली असेल, पूरपरिस्थिती असो, भूकंप अथवा कोणतीही दुर्घटना असो, एनसीसीचे कॅडेट्स मदतीला नक्कीच धावून जातात, असं मोदी म्हणाले. आज देशात एनसीसी ला मजबूत करण्यासाठी सातत्याने काम होत असल्याचं त्यांनी सांगितलं. 2014 मध्ये, एनसीसीत 14 लाख असणारी तरुण-तरुणी ची संख्या आता 2024 मध्ये**

20 लाखांहून अधिक झाल्याचं ते म्हणाले. तसेच पूर्वी एनसीसी मध्ये कॅडेट्स म्हणून मुलींची संख्या फक्त 25 टक्क्यांच्या आसपास होती जी आता जवळपास 40 टक्के झाली आहे, असं ते म्हणाले. विकसित भारत घडवण्यात युवावर्गाची भूमिका खूप मोठी आणि महत्वाची आहे.

*11-12 जनवरी को दिल्ली के भारत मंडपम में युवा विचारों का महाकुंभ होने जा रहा है, और इस पहल का नाम है 'विकसित भारत Young Leaders Dialogue' | भारत-भर से करोड़ों युवा इसमें भाग लेंगे | गाँव, block, जिले, राज्य और वहाँ से निकलकर चुने हुए ऐसे दो हजार युवा भारत मंडपम में 'विकसित भारत Young Leaders Dialogue' के लिए जुटेंगे |*

देशात होत असलेल्या डिजिटल क्रांतीमध्ये युवा वर्ग, ज्येष्ठ नागरिकांना डिजिटल क्रांतीमध्ये सामावून घेण्यासाठी पुढे येत आहे. डिजिटल अटक या प्रकाराची तरतूद अस्तित्वात नसून हे लोकांना फसवण्याचे कारस्थान असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पुन्हा एकदा स्पष्ट केलं. अशा प्रकारच्या गुन्हयांना, ज्येष्ठ नागरिक जास्त बळी पडतात. अशा परिस्थितीत त्यांना जागरुक करणं आणि सायबर घोटाळयांपासून वाचवण्यामध्ये मदत करणं ही आपली जबाबदारी असल्याचं ते म्हणाले. मुलांमध्ये सृजनशीलता वाढावी आणि पुस्तकांबद्दलचं प्रेम आणखी वाढावं यासाठी देशभरात विविध ठिकाणी होत असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची मोदी यांनी प्रशंसा केली आहे. यावेळी हैदराबादमध्ये 'फूड फॉर थॉट' फाऊंडेशनने निर्माण केलेल्या नाविन्यपूर्ण ग्रंथालयांचं त्यांनी कौतुक केलं. भारतात सुरु असलेल्या 'ओरल हिस्ट्री प्रोजेक्ट' बद्दल त्यांनी आज मन कि बात मधून माहिती दिली. या प्रकल्पा अंतर्गत, देशाच्या फाळणीच्या काळात बळी गेलेल्या कुटुंबियांचे अनुभव, इतिहासप्रेमी गोळा करत आहेत. आता देशात असे फार कमी लोक उरले आहेत ज्यांनी फाळणीची भीषणता पाहिली- अनुभवली आहे. अशा परिस्थितीत हा प्रयत्न अधिक महत्त्वाचा ठरला आहे, असं मोदी म्हणाले. यावेळी प्रधानमंत्र्यांनी 'एक पेड माँ के नाम' या मोहीमेच्या यशाबद्दलही श्रोत्यांना सांगितलं. या

मोहिमे अंतर्गत अवघ्या पाच महिन्यात १०० कोटी वृक्ष लागवडीचा टप्पा पार झाला असल्याची माहिती त्यांनी दिली.

**पक्षनिहाय मतदान टक्केवारी**

महाराष्ट्र विधानसभेसाठी बुधवार दिनांक 20 नोव्हेंबर रोजी सार्वत्रिक मतदानाची प्रक्रिया पार पडली. मतमोजणी काल शनिवार रोजी पूर्ण झाली. या निकालात महायुतीला तब्बल 230 जागा मिळाल्या तर महाविकास आघाडीला केवळ 46 जागांवर विजय मिळू शकला. महायुतीच्या 230 जागांमध्ये भाजपला 132, शिवसेनेला 57, आणि राष्ट्रवादी काँग्रेसला 41 जागा मिळाल्या आहेत तर महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेले काँग्रेस 16, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष 20 आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला केवळ दहा जागा मिळाल्या.

विदर्भात महायुतीला 48 जागा मिळाल्या. यामध्ये गोंदिया आणि वर्धा जिल्ह्यातील प्रत्येकी चार जागांचा समावेश आहे. गडचिरोलीतील तीन मतदारसंघांपैकी दोन, भंडारा जिल्ह्यातील तीन पैकी दोन, चंद्रपूर मधील सहापैकी पाच मतदारसंघात तर नागपूर जिल्ह्यातील बारा पैकी नऊ मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयी झाले. अकोला जिल्ह्यातील पाच पैकी तीन मतदारसंघात, बुलढाणा जिल्ह्यातील सात पैकी सहा मतदार संघात, यवतमाळ येथील सात पैकी पाच, अमरावती जिल्ह्यातील आठ पैकी सहा तर वाशिम जिल्ह्यातील तीन पैकी दोन मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत. महाविकास आघाडीला केवळ 12 जागा विदर्भात मिळाल्या आहेत. चंद्रपुरातील बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातून भाजपचे सुधीर मुनगंटीवार हे सातव्यांदा विजयी झाले तर साकोलीतून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा अखेरच्या फेरीत अवघ्या 208 मतांनी निसटता विजय झाला. यंदा झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये एकूण मतदानाच्या 26.77 टक्के मतदान भाजपला झालेलं आहे. मतदानाच्या टक्केवारीत काँग्रेसला 12 पूर्णांक 42 टक्के मतदान झालं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला 9.01% राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला 11.28% शिवसेनेला 12 पूर्णांक 28% तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला 9 पूर्णांक 96 टक्के इतकं मतदान झालेलं

आहे. इतर पक्ष आणि अपक्ष उमेदवारांसाठी 13 पूर्णांक 82 टक्के मतदान झालेलं आहे. दरम्यान, भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीच्या दणदणीत विजयानंतर महाराष्ट्रात सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. नवीन मुख्यमंत्र्यांचं नाव निश्चित करण्यापूर्वी युतीचे तिन्ही पक्ष आपापल्या विधीमंडळ पक्षांच्या स्वतंत्र बैठका घेणार आहेत. महाराष्ट्रात सरकार स्थापन करण्याविषयी महायुतीचे सर्व घटक पक्ष मिळून चर्चा करू, असं शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. महायुतीमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटप करताना कोणतेही मतभेद नव्हते. त्यामुळे सत्तास्थापन करतानाही मतभेद नाहीत असं शिंदे यांनी सांगितलं.

## अजित पवार

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ गटनेतेपदी अजित पवार यांची निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक आज मुंबईत पार पडली. त्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. अजित पवारांसह खासदार प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, आमदार दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे यांच्यासह इतर नेते या बैठकीला उपस्थित होते.

## हिवाळी अधिवेशन बैठक

संसदेच्या उद्यापासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात सरकार कोणत्याही मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी तयार असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत सरकारनं बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. अधिवेशनादरम्यान लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज सुरळीत पार पाडायचं आवाहन रिजिजू यांनी विरोधी पक्षांना केलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली ही सर्वपक्षीय बैठक झाली. हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होणार असून, ते २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे. मात्र, २६ नोव्हेंबरला संविधान दिनानिमित्त सदनाचं कामकाज होणार नाही.

**<u>रेल्वेचे राष्ट्रीय अधिवेशन</u>**

**अखिल भारतीय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती** SC/ST **रेल्वे कर्मचारी संघटना यांच्या वतीने नागपूरच्या अजनी रेल्वे ग्राउंड इथं उदया आणि परवा,दिनांक 25 आणि 26 नोव्हेंबर रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि राष्ट्रीय अधिवेशनाचं आयोजन करण्यात आलं आहे.उद्या सकाळी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते या कार्यक्रमाचं उद्घाटन होईल.**

**<u>हरघर संविधान</u>**

**भारतीय संविधानास** 75 **वर्ष पूर्ण झाल्याच्या औचित्याने** 26 **नोव्हेंबर, अर्थात संविधान दिनापासून वर्षभर 'हरघर संविधान' साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. भारतीय संविधानातील मूल्य, प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचावेत, स्वातंत्र्याच्या मुल्यांसह राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला बहाल केलेल्या अधिकारासह राष्ट्रासाठी कर्तव्याची जाणीव अधिक व्यापक व्हावी यासाठी नागपूर जिल्ह्यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करू, असं जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी सांगितलं. येत्या** 26 **नोव्हेंबर रोजी होणाऱ्या संविधान दिनाच्या निमित्ताने आयोजित बैठकीत ते बोलत होते.**

**<u>हवामान</u>**

**मागील** 24 **तासांत गोंदिया इथं सर्वात कमी, किमान तापमानाची नोंद करण्यात आली. बारा पूर्णांक सात दशांश अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान इथं नोंदवलं गेलं. याशिवाय नागपुरात किमान तापमान** 13 **अंश, गडचिरोली इथं** 13.6 **आणि वर्धा इथं** 13.4 **अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.**

******